**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ९९/२०१६</u>**

निशाणी क्र. ६२

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवरील जबाब

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नांव – संगिता गोविंद सावंत

माझे वय – ५४ वर्षे

व्यवसाय – घरकाम

राहण्याचे ठिकाण – हनुमान नगर पहिली गल्ली, १०० फुटी, सांगली

## सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पखाली यांचेमार्फत

१. दि. १४.०७.२०१५ रोजी मी, माझे पती व दोन मुले असे एकत्रात राहत होतो. त्यादिवशी बाळू कांबळे याने रस्त्यावर येवून दारु पिवून माझ्या पतीस शिवीगाळ करण्यास सुरुवात केली होती. त्यावर माझे पती बाळू काबळे यांस असे म्हणाले की रोज रोज शिवीगाळ काय करतोस, मला मारणास असशील तर मार. त्यावेळी रेणुका केंगार, सायबु केंगार, आण्णाप्पा पासरी, कुसुम कांबळे, पार्वती कांबळे, भिमा तांबे हे सर्वजण माझ्या पतीभोवती गोळा झाले व माझ्या पतीला धक्का देत त्यांच्या घराकडे ओढून नेले. ते माझ्या पतीला मारहाण करत नेत होते त्यामुळे मी माझ्या मुलाला उठावयास घरात गेले. मुलाला घेवून आले त्यावेळेस आरोपी बाळू कांबळे हा काठीने माझ्या पतीला मारत होता. बाळू कांबळे याने माझ्या पतीला डोक्यात व पाठीत मारले त्यामुळे माझ्या पतीच्या डोक्यातून रक्त आले होते. माझा मुलगा विजयकुमार हा माझ्या पतीकडे धावत गेला असता सायबु केंगार याने त्याच्या डाव्या हातावर काठीने मारले. मी व माझा दुसरा मुलगा राजेश असे जात असताना महिला आरोपींनी माझ्या केसाला धरुन मला कंम्पाऊन्डवर दाबले व मारहाण केली. सायबु केंगार याने राजेश याचा चश्मा काढून फेकून दिला व त्यालादेखील तोंडावर दाबले. माझे पती मारहाणीत खाली पडले त्यानंतर इतर आरोपींनी मला आणि

राजेशला सोडले. ही सर्व घटना रात्री ९.३० ते १०.०० चे सुमारास घडली.

२. सर्वप्रथम आम्ही जवळच्या हॉस्पीटलमध्ये गेलो. त्यांनी उपचार कले नाहीत त्यामुळे आम्ही माझ्या पतीला आदित्य हॉस्पीटलमध्ये नेले. परंतु माझ्या पतीचे जास्त रक्त गेल्यामुळे त्यांनीदेखील हॉस्पीटलमध्ये भरती करुन घेतले नाही व आम्हाला सिव्हील हॉस्पीटल येथे पाठविले. तेथे माझ्या पतीवर पहाटे ३.३० वाजता उपचार करुन आदित्य हॉस्पीटल येथे पाठविले. तेथे माझ्या पतीला दोन दिवस भरती करुन उपचार करण्यात आले. घटनेबाबत मी फिर्याद दाखल केली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ६३** देण्यात येते.

३. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला. ते घटनास्थळ पोलिसांना मी दाखविले होते. दि. १६.०७.२०१५ रोजी माझ्या पतीचे कपडे मी पोलिसांसमोर हजर केली होती. त्यामध्ये हिरव्या रंगाचा हाफ शर्ट व टॉवेल लुंगी मारलेला होता. माझे पती आजरोजी हयात नाहीत. ते दि. २२ सप्टेंबर २०२० रोजी मयत झाले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी बाळू कांबळे व कुसमा कांबळे हे न्यायालयात हजर आहेत. आरोपी बाळू कांबळे व सायबु केंगार यांनी माझ्या पतीला ज्या काठयांनी मारले त्या काठया आता मला दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यांस एकत्रीत **आर्टिकल अ** देण्यात येते. माझ्या पतीचे टीशर्ट व लुंगी आता मला दाखविण्यात आली. ते तेच आहे. त्यास एकत्रीत **आर्टिकल ब** देण्यात येते. सरकारी दवाखान्यात माझेवर तात्पुरते उपचार करण्यात आले होते.

## <u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. वाय. बी. नाझरे</u>

४. आम्ही मागील ३० ते ३५ वर्षांपासून वरील पत्त्यावर राहतो. त्यामुळे शेजारील लोकांना आम्ही ओळखतो. आरोपी क्र. १, ३ व ५ हे आमच्या शेजारी राहावयास आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. २ हे त्यावेळेस सांगलीवाडी येथे राहावयास होते. हे म्हणणे खरे नाही की सायबु केंगार व रेणुका केंगार हे त्यावेळेस मंगळवेढा येथे राहावयास होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. ७ हा शामरावनगर,

सांगली येथे राहावयास होता. हे म्हणणे खरे नाही की इतर आरोपींचे कार्यक्रमाच्या निमित्ताने बाळू कांबळेकडे येणे जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की आमच्या शेजारी मुस्लीम समाजाची घरे आहेत. गोपाळ सावंत हे माझे दिर आहेत. जयश्री ही माझी जाऊ आहे. त्यांना अर्जुन, युवराज व प्रमोद अशी तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रमोद हा दिव्यांग आहे. त्यामुळे त्यास हिंडता फिरता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळेस माझे पती व गोपाळ यांच्यामध्ये वाद चालू होता. त्यामुळे आम्ही आपापल्या घरांची वाटणी करुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की त्या वाटणीत संडासची जागा आमच्या हिश्श्यास आली होती. हे म्हणणे खरे नाही की वाटणी झाल्यापासून गोपाळ यांच्याशी बोलणे चालणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की संडासची जागा आमच्या हिश्श्यात आल्यामुळे गोपाळ यांना वापरत येत नव्हती.

५. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ यांस दारुचे व्यसन आहे. हे म्हणणे खरे आहे की दारुच्या नशेत आरोपी क्र. १ हा बऱ्याच वेळा शिव्या देत असतो. हे म्हणणे खरे नाही की प्रमोद हा दिव्यांग असल्याने बाळू कांबळे याने त्याच्या संडासची जागा प्रमोद यास वापरण्यास दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्या कारणावरुन माझ्या पतीचे व गोपाळचे बऱ्याच वेळा भांडण झाले होते.

६. विश्रामबाग पोलिस स्टेशन आमच्या घरापासून अंदाजे १ ते २ किलोमीटर अंतरावर आहे. पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदविला होता. मी फिर्याद देताना आरोपींनी मला केसाला धरुन तोंडावर धरुन कंम्पाऊन्डवर दाबले होते व माझ्या मुलाच्या तोंडावर धरुन कंम्पाऊन्डवर दाबले असे सांगितले होते. तसे पोलिसांनी माझ्या फिर्यादीमध्ये का लिहिले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे पती खाली पडले होते, आरोपींनी त्यांना घेराव घातला होता व मारहाण करत ओढत नेले होते हा मजकूर मी पोलिसांना सांगितला होता. तसे पोलिसांनी माझ्या फिर्यादीमध्ये का लिहिले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

७. माझ्या घरासमोर २० फुटांचा रस्ता आहे. घटनेच्या वेळी अंधार होता. घटनेच्या वेळी मी व माझी दोन्ही मुले घरात होतो त्यामुळे बाहेर कोणाचे भांडण चालू आहे हे आमच्या लवकर लक्षात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की बाळू कांबळे हा दररोज शिव्या देत असल्यामुळे माझ्या पती त्यास मारावयास गेले होते. हे म्हणणे खरे

नाही की बाहेर मोठा आवाज आल्यामुळे माझा मुलगा राजेश बाहेर आला व त्याने बाळू कांबळे याला काठीने मारले. घटनेच्या वेळी आजूबाजूचे लोक जमा झाले व सोडवासोडव केली असे काही घडले नव्हते.

प्रश्न – तुमच्या घरातील इतर सदस्यांना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद देण्यास काही अडचण नव्हती ?

उत्तर – मालकाला लागल्यामुळे जाऊ शकत नव्हतो.

हे म्हणणे खरे नाही की बाळू कांबळे हा दररोज शिव्या देत असल्याने माझ्या पतीने त्याला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्या पतीला डोक्यात व पाठीवर काठीने मारले हे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न – घटनेनंतर आरोपी हे दुसऱ्या ठिकाणी राहावयास गेले ?

उत्तर – घटनेनंतर पाच ते सहा वर्षांनंतर माझे पती मयत झाल्यानंतर ते दुसऱ्या ठिकाणी राहावयास गेले.

८. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. आर्टिकल अ वरील काठयाप्रमाणे काठया इतरत्रदेखील उपलब्ध होऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल अ वरील काठया मी पोलिसांना दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की गोपाळ यांचा मुलगा प्रमोद यांस संडासची जागा वापरण्यास दिली त्याचा राग मनात धरुन मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल अ वरील काठया हया त्याच आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल ब वरील कपडे हे तेच आहेत हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

साक्षीदाराचा जबाब माझेसमक्ष नोंदवणेत आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

सांगली. ( आर. पी. कुलकर्णी )

दिनांकः ०५.०२.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली